**किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१२३/२०२४**

**फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २०० प्रमाणे**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.१**

**नाव** – शिवप्रसाद शंकरप्पा कोरे

**वय** – ६० वर्षे, **व्यवसाय** – व्यापार

**राहणार** – देगलूर रोड, उदगीर, ता.उदगीर

**शपथेवर जबाब अर्जदार तर्फे साक्षीदार यांची जबानी**

माझ्या दुकानाचे नाव एशियन एंटरप्रायजेस आहे. दिनांक १०/०५/२०२३ रोजी रात्री ८.०० वाजता मी दुकानात होतो. त्यावेळी सागर शिवराज अंबेसंगे यांना शंकर हुमनाबादकर याने दारू पाजून दुकानात पाठवून दिले. सागर शिवराज अंबेसंगे याने माझ्या गच्चीला धरून मला धक्काबुक्की केली. तसेच त्याने मला जीवे मारण्याची धमकी दिली. आमचे भांडण बस्वराज कोरे व सुभाष पटवारी यांनी सोडविले. मी सागर व शंकर यांच्याविरूद्ध दाखल केलेली फिर्याद काढून घेण्याबाबत मला त्याने धमकी दिली. सदर फिर्याद काढून न घेतल्यास माझ्याविरूद्ध खोटी अट्रॉसिटीची केस दाखल करण्याची देखील त्याने मला धमकी दिली. सदर घटनेबाबत मी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. परंतु पोलिसांनी एफ.आय.आर. दाखल करून घेतली नाही.

साक्षीदार यांची सही

समक्ष

०८।१२।२५

**(के. ए. यादव)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर

(न्यायालय क्र.२)

दि.०८/१२/२०२५